# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- १२/१२/२०१८

## मुंबई आग्रा महामार्गावर अवैधरित्या मद्य वाहतुक करणारे इसमावर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

---

जिल्हयातील महामार्गांवर अवैधरित्या होणारे मद्यवाहतुकीस आळा बसावा यासाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कारवाई सुरू आहे. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गावर मालेगाव तालुक्यातील मुंगसे शिवारात अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमावर छापा टाकला.

आज दिनांक १२/१२/२०१८ रोजी दुपारचे सुमारास स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमांवर कारवाई करणेसाठी मालेगाव परिसरात गस्त घालत होते. दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे, मालेगाव शहरातुन काही इसम मुंबई आग्रा महामार्गावर अवैधरित्या मद्याची वाहतुक करत असलेबाबत समजले, त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मालेगाव परिसरातील मुंबई आग्रा महामार्गावर मुंगसे शिवारात सापळा रचुन मारूती कार क्र. एम.एच.०१.जी.ए.१२२ हे वाहन पाठलाग करून अडविले. सदर वाहना वरील चालक **नामे देविदास रावसाहेब नगरकर, वय ३५, रा. पिंपळवाडी रोड शिर्डी, ता.राहता, जि.अहमदनगर, हल्ली उमराणे, ता.देवळा** यास जागेवरच ताब्यात घेवुन मारूती कारची झडती घेतली असता, कारमध्ये **प्रिन्स देशी दारूचे ०६ बॉक्स व टॅंगो देशी दारूचे ०२ बॉक्स असा एकुण १९,९६८ रू. किं.चा** अवैध मद्यसाठा मिळुन आला. सदर इसम हा बेकायदेशीरपणे चोरटया रितीने मद्य वाहतुक करतांना मिळुन आला असुन त्याचे कब्जातुन १९,९६८ रू. किं.ची देशी दारू व मारूती कार असा **एकुण १ लाख १ हजार ९६८ रू. किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला असुन त्याचेविरूध्द **मालेगाव तालुका** पोलीस ठाणेस **मुंबई दारूबंदी कायद्यान्वये** गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप दुनगहू, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, चेतन संवत्सरकर, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमांवर यापुढेही अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.